# महाराष्ट्र शासन
# जलसंपदा विभाग

महासंचालक
संकल्पन,प्रशिक्षण व संशोधन
महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, (मेरी)
दिंडोरी रोड, नाशिक-४२२ ००४
महाराष्ट्र राज्य (भारत)

दूरध्वनी क्रमांक
कार्यालय - ०२५३-२५३०६२८
निवास - ०२५३-२५३४२६६
फॅक्स - ०२५३-२५३०७६४
ई-मेल - aomeri-nsk@sancharnet.in
rsgid@dataone.in

## - तांत्रिक परिपत्रक -

विषय-उपसा सिंचन योजनांच्या व्यवहार्यतेबाबत------
पंपगृहाजवळील दरवाजा वास्तूरचना
वगळण्याबाबत.

**प्रस्तावना-**

महाराष्ट्रात प्रादेशिक विभाग निहाय/खोरे निहाय पाटबंधारे विकास महामंडळांची निर्मिती झाल्यानंतर उपसा सिंचन योजनांची कामे मोठया प्रमाणात हाती घेण्यांत आली. तशी या पूर्वीही विष्णुपुरी उपसा सिंचन योजना पूर्ण करण्यांत आली होती. तथापि, या प्रकारची कामे, प्रथमच मोठया प्रमाणात हाती घेण्यांत आल्याने योजनांचे आराखडे, व संकल्पने त्यावेळचे उपलब्ध तंत्रज्ञान,वेळेची निकड व क्षेत्रिय परिस्थिती लक्षात घेऊन तयार करण्यांत आले होते.

- गेल्या १० वर्षांच्या प्रत्यक्ष अनुभवानंतर,वेळोवेळी विकसित होणारे तंत्रज्ञान, क्षेत्रिय स्तरावरील अडचणी व यांत्रिकी विभागाचे अनुभव, विविध पातळ्यांवरील तांत्रिक विषयावरील बैठकांमध्ये क्षेत्रिय अधिका-यांनी केलेली चर्चा, झालेल्या कामाचा मागोवा इ. विचारात घेऊन योजनांचे आराखडे व संकल्पनात महत्वपूर्ण बदल करणे आवश्यक ठरले आहे. पूर्वी पंपाची दुरुस्ती/देखभाल, पंपगृहाखाली पंप संम्पमध्ये करण्यांत येत असे. तथापि आता पंप दुरुस्तीचे भाग यारीने (क्रेनने) उचलून दुरुस्ती, पंपगृहाच्या सेवा कक्षात करण्यांत येते. त्यामुळे पंपगृह व संलग्न बांधकामाच्या काही घटकांमध्ये अनुषंगिक कपात करुन उपसा सिंचन योजनांची व्यवहार्यता वाढविणे शक्य आहे असे दिसून येते. त्याअनुषंगाने पंपगृहालगत दरवाजा वास्तुरचना वगळण्याबाबत या परिपत्रकात निर्देशित करण्यांत येत आहे. यास मुख्य अभियंता (यांत्रिकी) जलसंपदा विभाग, नाशिक यांनी सहमती कळविलेली आहे. या बदलामुळे पंपगृहाच्या Hydraulics च्या दृष्टीने कोणताही विपरित परिणाम होणार नाही. त्यामुळे योजनेच्या खर्चात लक्षणीय बचत होऊन तांत्रिक उद्देशही सफल होतो.

वरील मुद्यांचा विचार करुन उपसा सिंचन योजनांच्या व्यवहार्यतेच्या दृष्टीने उपसा सिंचन योजनांचे संकल्पन करीत असतांना, तसेच बांधकामाधीन असलेल्या परंतु वरीलप्रमाणे बदल सामावून घेऊ शकणा-या उपसा सिंचन योजनांच्या बाबतीत खालील मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करण्यात यावा.

मार्गदर्शक सूचना-

१) पंपगृहालगतची दरवाजा वास्तुरचना वगळण्याबाबत कार्यवाही करावी.

२) स्थलपरत्वे पंपगृह व अनुषंगिक घटकातील यथोचित तांत्रिक मांडणीचे संकल्पन करण्यात यावे.

(मु.सं.मुंढे)
महासंचालक
संकल्पन, प्रशिक्षण व संशोधन
महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था
नाशिक-४२२ ००४.

जा.क्र.तांप्र/मअसंसं/अअ(वि.गृहे)/30 /२००६१
संकल्पन, प्रशिक्षण व संशोधन,
महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक-४,
दिनांक - 2 जानेवारी, २००७.

प्रत- मा.सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत- सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग, यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.
प्रत - सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, यांना माहितीस्तव अग्रेषित.
प्रत - अधीक्षक अभियंता(वि.गृहे) यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.
प्रत -अधीक्षक अभियंता, (दरवाजे व विमोचके) यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.
प्रत -अधीक्षक अभियंता(मा.ध./द.ध.)मसंसं, नाशिक यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.
प्रत- सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग यांना माहितीस्तव अग्रेषित.
प्रत- कार्यकारी अभियंता, संकल्पचित्र विभाग, विगृ-१, विगृ-२, विगृ-३, विग-४, म.सं.स.नाशिक
प्रत- मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना विभाग ( Cell ) संकल्पन, प्रशिक्षण व संशोधन, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक-४ यांना माहितीस्तव.

प्रत - मा.

अधीक्षक अभियंता(वि.गृहे)
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक-४.